# महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ, लिमिटेड
# Maharashtra Rajya Sahakari Sakhar Karkhana Sangh Ltd.
(Registered under Sec. 10 of Bombay Co-op. Societies Act. 1925)

Telephones : 2204 2676 / 2901 / 4068 6900
Fax : 091-22-2204 2578 / 4068 6998
Telegram : "SAKARSANGH" Mumbai
E-mail : mahasugar@airtelmail.in
mahasugarfed@gmail.com
Website : www.mahasugarfed.org

"SAKHAR BHAVAN", Plot No. 230,
Block No. 3, Backbay Reclamation,
Nariman Point, Mumbai - 400 021.

दिनांक : 8/10/2011

प्रति,
डॉ. प्रदिप बावडेकर
व्यवस्थापकीय संचालक
मिटकॉन कन्सल्टंन्सी ॲण्ड इंजिनिअरींग सर्व्हिसेस
कुबेरा चेंबर्स, डॉ. राजेंद्र प्रसाद रोड,
शिवाजीनगर, पुणे–411 005

श्रीमान आदरणीय डॉ प्रदिपजी,

हा संवाद साधताना मला अत्यंत आनंद होत आहे की, पुणे स्थित सकाळ साप्ताहिक दि. 24 सप्टेबर 2011 रोजीच्या अंकामध्ये आपले भव्य सहचित्र मुखपृष्ठावर नमुद करून, "'मिटकॉन' ला ग्लोबल करणारे डॉ. प्रदिप बावडेकर", अशी यशाची कथा प्रसारीत केली आहे.

लेखक मंगेश कोळपकर यांनी मराठी माणसाची मानसिकता, मिटकॉनमधील महत्वाचे बदल, डॉ. बावडेकरांचा सहभाग, जागतिकीकरणाचे सूत्र : प्रोफेशनल ॲप्रोच, स्पिड व ट्रान्स्फरन्सी आणि मिटकॉनमधील निरनिराळे दहा विभाग यांची अत्यंत सुक्ष्मतेने व महत्वपूर्ण विश्लेषण केले आहे.

मिटकॉनचे सतत संशोधन, नवे अभ्यासक्रम, नव्या उदयोगांचे प्रकल्प अहवाल यामध्ये सामान्य व्यक्ती हीच केंद्रबिंदू मानून व भविष्यातही हेच तत्व जोपासण्याचे संस्थेचे ध्येय असल्याचे नमूद केले आहे.

आपल्या दोघांचा परिचय तसा नविनच आहे. कोजनरेशन असोसिएशन ऑफ इंडिया, पुणे या संस्थेची स्थापना महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ लि. मुंबई व मिटकॉन कन्सल्टंन्सी ॲण्ड इंजिनिअरींग सर्व्हिसेस पुणे यांनी एकत्र येवून केली व या निमित्ताने माझा आपल्या बहूयामी व कतृत्वसंपन्न नेतृत्वाशी परिचय झाला व विचारांची देवाण–घेवाण होत आहे. याबद्दल मी स्वतःस भाग्यवान समजतो.

कोजनरेशन असोसिएशन ऑफ इंडिया, पुणे या संस्थेच्या पुढील भविष्यकालीन वाटचालीत आपला व श्री सुनीलजी नातु यांचे समवेत माझा आत्मियतेने सहभाग असेल असे मी येथे नमूद करू इच्छितो.

आपणास, आपल्या कुटूंबीयांस व मिटकॉन संस्थेस माझ्या व माझे कुटूंबीय व साखर संघाच्या मनःपूर्वक हार्दिक शुभकामना !

आपला स्नेहांकित,
अजित चौगुले
अजित चौगुले 08/10/2011.
व्यवस्थापकीय संचालक (प्र.)